# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१

ईमेलद्वारे

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.७४(१६-१७)/३०२
नागपूर ४४०००१, दिनांक ०२/०७/२०२४

प्रति,
अध्यक्ष
कास्ट्राईब कर्मचारी महासंघ,
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय :** मा.सर्वोच्च न्यायालय, विशेष अनुमती याचिका क्र. १९२६२/२०१६ मधील सिव्हील अपील क्र. १७९७४/२०१७
महाराष्ट्र वनरक्षक व वनपाल संघटना विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर

**संदर्भ:**
१) मा. सर्वोच्च न्यायालय येथे एसएलपी क्र. १९२६२/२०१६ मध्ये दिनांक ३/११/२०१७ रोजी दिलेले आदेश
२) अध्यक्ष, कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, नागपूर यांचे निवेदन दिनांक २७/७/२०२२
३) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.७४(१६-१७)/७७, दिनांक १७/७/२०२३
४) शासन, महसूल व वनविभाग पत्र क्र. एस-३०/०९/२३/प्र.क्र.२१०/फ-४, दिनांक २०/६/२०२४

प्रस्तुत प्रकरणी आपण दिनांक २७/७/२०२२ चे निवेदनात असे नमुद केले आहे की, सन २०१४ मध्ये मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कनिष्ठतम वनरक्षकांना वनपाल पदावर पदोन्नती दिली आहे, हे कनिष्ठतम कर्मचारी वनपाल पदावर कार्यरत असले तरी मा. सर्वोच्च न्याय निवाड्यानुसार सदर मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेकरीता पदवीची अट चुकीची ठरविण्यात आली आहे, त्यामुळे या वनपालांना वनपालांचे जेष्ठता यादीत वरचे स्थान (२०१४ चे) देणे संविधानिक नाही, करीता अशा वनपालांची जेष्ठता ही त्यांचे वनरक्षक पदाची मुळ जेष्ठताप्रमाणे ठेवणेबाबत आपण विनंती केली होती.

२. या प्रकरणी सन २०१४ मध्ये मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे वनपाल पदावर नियुक्ती दिलेल्या व त्या अनुषंगाने जेष्ठता यादीत समाविष्ट केलेल्या वनपालांची २०१४ ची जेष्ठता काढून घेता येईल किंवा कसे, याबाबत या कार्यालयाचे पत्र दिनांक १७/७/२०२३ (संदर्भ ३) अन्वये शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन शासन पत्र दिनांक २०/६/२०२४ (संदर्भ ४) अन्वये मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. सदर पत्रानुसार विभागीय मर्यादित परीक्षेद्वारे वनपाल पदावर निवड झालेल्या कर्मचा-यांची पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयाने अबाधित ठेवली आहे, त्यामुळे विभागीय मर्यादित परीक्षेद्वारे वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नत झालेल्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावर सेवाविषयक सर्व लाभ आपोआप लागू होत असल्याने त्यांची विभागीय मर्यादित परीक्षेद्वारे वनपाल पदावर निवड / रुजू झाल्याच्या

दिनांकास सेवाज्येष्ठता निश्चित करणेच्या शासनाच्या सुचना आहेत. शासनाच्या दिनांक २०/६/२०२४ च्या पत्राची प्रत यासोबत जोडली आहे.

३. शासनाचे उपरोक्त दिनांक २०/६/२०२४ (संदर्भ ४) मधील सुचना विचारात घेता आपले निवेदन दिनांक २७/७/२०२२ नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**सहपत्र**:- संदर्भ ४ ची प्रत

Arjuna K.R 02/07/24

(अर्जुना के.आर.)
उपवनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर

**टिप्पणी मा. प्र.मु.व.सं. (व.ब.प्र.) यांचेकडून अनुमोदीत**

**प्रतिलिपी** (ई-मेलद्वारे):-

१) प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) सर्व
३) वनसंरक्षक (प्रा.) सर्व
४) कक्ष अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, कक्ष-३१

(1525)

मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

# महसूल व वन विभाग
# मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

899
25/06/24

ई-मेल-vinayak.jakhlekar@nic.in

---

क्रमांक:-एस-३०/०९/२३/प्र.क्र.२१०/फ-४ दिनांक:-२० जून, २०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय:- मा. सर्वोच्च न्यायालय, विशेष अनुमती याचिका क्र.१९२६२/२०१६ मधील सिव्हील अपील क्र.१७९७४/२०१७
महाराष्ट्र वनरक्षक व वनपाल संघटना वि. महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ:- १) आपले पत्र क्र.कक्ष-१० (२)/आस्था/एक/७४ (१६-१७)/७७/२०२३-२४, दि.१७.०७.२०२३.
२) आपले पत्र क्र.कक्ष-१० (२)/आस्था/एक/७४ (१६-१७)/७७/२०२३-२४, दि.१७.०७.२०२३

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९२६२/२०१६ मधील सिव्हील अपील क्र.१७९७४/२०१७ मध्ये दि.०३.११.२०१७ रोजी पारित केलेल्या निर्णयानुसार सन २०१४ साली मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे वनपाल पदावर नियुक्ती दिलेल्या व त्यानुषंगाने सेवाज्येष्ठता यादीत समाविष्ट केलेल्या वनपालांची सन २०१४ ची सेवाज्येष्ठता काढून घ्यावी किंवा कसे याबाबत शासन स्तरावरून मार्गदर्शन करण्याची संदर्भाधीन पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९२६२/२०१६ मधील सिव्हील अपील क्र.१७९७४/२०१७ मध्ये दि.०३.११.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सेवाप्रवेश नियम, दि.२२.१०.२०१३ मधील वनपाल पदावरील नियुक्ती देण्यासाठी विभागीय परीक्षेकरिता बसण्यासाठी पदवी अर्हता धारण केलेली असणे, ही तरतूद असंविधानिक (unconstitutional) ठरवली आहे. तथापि, सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार अगोदरच पदोन्नती देण्यात आली असल्यास सदर कार्यवाहीवर कोणताही परिणाम होणार नाही, असे स्पष्ट करून विभागीय मर्यादित परीक्षेव्दारे वनपाल पदावर निवड झालेल्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयाने अबाधित ठेवली आहे. त्यामुळे विभागीय मर्यादित परीक्षेव्दारे वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या

10(2)(1)
25/06/24

पदावरील सेवाविषयक सर्व लाभ आपोआप लागू होत असल्याने त्यांची विभागीय मर्यादित परीक्षेव्दारे वनपाल पदावर निवड/रुजू झाल्याच्या दिनांकास सेवाज्येष्ठता निश्चित करावी. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

(वि.श.जाखलेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवड नस्ती (फ-४)